# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.२

सभावृत्तांत

दिनांक ०१/०९/२०१७ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे सप्टेंबर २०१७ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०१/०९/२०१७ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. कदम शशिकांत गणपत | सभापती |
| २) | मा. श्रीमती दर्शले रेखा राजेश | सदस्या |
| ३) | मा. श्री. कलाटे राहुल तानाजी | सदस्य |
| ४) | मा. श्री. कलाटे मयुर पांडुरंग | सदस्य |
| ५) | मा. श्रीमती ममता विनायक गायकवाड | सदस्या |
| ६) | मा.श्री.कामठे तुषार गजानन | सदस्य |
| ७) | मा.चोंधे आरती सुरेश | सदस्या |
| ८) | मा.कस्पटे संदिप अरूण | सदस्य |
| ९) | मा. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| १०) | मा.कुटे निर्मला संजय | सदस्या |
| ११) | मा. श्री. विठ्ठल उर्फ नाना काटे | सदस्य |
| १२) | मा.श्रीमती मुंढे उषा अंकुश | सदस्या |
| १३) | मा. श्रीमती लोखंडे चंदा राजू | सदस्या |
| १४) | मा.श्री. सागर आंगोळकर | सदस्य |

-----------------

याशिवाय, मा. सिताराम बहुरे, क्षेत्रीय अधिकारी, तथा प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा.प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. संदेश चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. डॉ. सतीश गोरे, पशू वैद्यकीय अधिकारी, मा.अशोक बोनगीर, लेखाधिकारी, मा. सुर्यकांत मोहिते, उपअभियंता, जलनि:सारण, मा. माधव सोनवणे, उपअभियंता, विद्युत, मा. राजेश भाट, मुख्य आरोग्य निरीक्षक, तथा प्रभारी सहा. आरोग्याधिकारी, मा. पाटील एस. वाय.,मा. संध्या वाघ, उपअभियंता, स्थापत्य, मा. भाऊसाहेब साबळे, मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा.

ए.जी. जाधव, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा.व्हि.एस.गेंगजे, क्रीडा निरीक्षक, मा. रोकडे जयवंत, मा. मुलाणी बी.एम. कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. अमिन दिक्षीत, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. भालेराव यु.ए. कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. विजय सोनवणे, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. सरोदे वसंत, आरोग्य निरीक्षक, मा.बैचे डी.के., हॉर्टीकल्चर सुपरवायझर, उद्यान विभाग, मा. सी.सी. मोरे. हॉर्टीकल्चर सुपरवायझर, मा. सुनिल दुदुसकर, उद्यान सहाय्यक, मा.लक्ष्मण काळे, मा. एम.पी. सुभेदार, अतिक्रमण निरीक्षक, इ. अधिकारी उपस्थित होते.

-----------

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव** : दिनांक ०१/०९/२०१७ रोजीची माहे सप्टेंबरच्या नियमित ड प्रभाग समिती सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : सर्व अधिका-यांनी त्यांची ओळख सर्व उपस्थित नगरसदस्यांना करुन दयावी व नंतर आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात यावे.

त्यानुसार सर्व उपस्थित अधिका-यांनी सभागृहात उपस्थित नगरसदस्यांना त्यांची ओळख करुन दिली.

**मा. सचिव, सभा शाखा** :- आजच्या सभेच्या कार्यपत्रिकेवर कोणताही विषय नसल्याने सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

**सन्मा. सदस्यांच्या मागणीप्रमाणे व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१: मौजे पिंपळे सौदागर येथील स.नं. ६४ व ६५ या मिळकतीमध्ये विकास योजनेव्यतिरिक्त महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अन्वये १२.० मीटर रस्ता घोषित करणे (म्युनिसिपल रोड)

विषय क्र. २ : प्रभाग क्र. २६ पिंपळे निलख येथील बस स्थानकाच्या जागेवरील अस्तित्वात असलेली जुनी मुतारी पाडण्यास मान्यता मिळणे

**तदनंतर मा. ड प्रभाग समिती माहे सप्टेंबर २०१७ चे नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.**

**मा. सचिव, सभा शाखा** : :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. १ माहे ऑगस्ट २०१७ च्या मासिक सभांचे सभावृत्तांत कायम करणे

**मा. सभापती** : मागील सभा कार्यपत्रिका क्र. १ माहे ऑगस्ट २०१७ च्या मासिक सभेचा सभावृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** : माहे सप्टेंबर २०१७ च्या कार्यपत्रिका क्र. २ वर कोणतेही विषय नसल्याने सन्मा. नगरसदस्यांच्या मागणीनुसार व मा. सभापती यांचे मान्यतेने दिनांक ०१/०९/२०१७ रोजीच्या सभेमध्ये ऐन वेळी दाखल केलेले विषयांवर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. १ ठराव क्र. ३

दिनांक ०१/०९/२०१७ विभाग: नगररचना विभाग

सूचक : मा.शत्रुघ्न उर्फ बापु सिताराम काटे अनुमोदक : मा. निर्मला संजय कुटे

संदर्भ : मा. शत्रुघ्न उर्फ बापु सिताराम काटे यांचेकडील दि. १/९/२०१७ रोजीचा प्रस्ताव

मौजे पिंपळे सौदागर येथील स.नं. ६४ व ६५ मधील पुर्व पश्चिम रस्ता १२.० मीटर करण्यास शासन निर्णय क्र. टीपीएस/१८१२/१५९/प्र.क्र. ६३/१२/पुर्नबांधणी क्र. ३०/नवि–१३ दि. ५/३/२०१७ अन्वये कळविण्यात आले असुन सदर भागातील वाढती रहदारी लक्षात घेता मौजे पिंपळे सौदागर येथील स.नं. ६४ व ६५ मधील पूर्व पश्चिम रस्ता १२.० मीटर रस्ता प्रस्तावित करुन महाराष्ट्र महापालिका अधिनियमामधील कलम २०५ अन्वये घोषित (म्युनिसिपल रोड) करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

----------------

विषय क्र. २ ठराव क्र. ४

दिनांक ०१/०९/२०१७ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा.आरती सुरेश चोंधे अनुमोदक : मा. संदीप कस्पटे

संदर्भ :मा. आरती सुरेश चोंधे यांचा दिनांक १/९/२०१७ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ पिंपळे निलख येथील बस स्थानकाच्या जागेवरील अस्तित्वात असलेली जुनी मुतारी पाडण्यास या प्रस्तावान्वये मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

----------------

त्यानंतर मा. सभापती यांचे मान्यतेने सन्मा. नगरसदस्यांनी आरोग्य विभागाकडील कामकाजाबाबत त्यांचे मत प्रदर्शित केले.

**मा. सभापती**: आरोग्य विभागाचे संबंधित अधिकारी यांनी सन्मा. नगरसदस्यांनी मांडलेल्या प्रत्येक मुद्यांवर आवश्यक ती कार्यवाही करावी व त्याबाबत संबंधित नगरसदस्यांना आवश्यक माहिती देऊन प्रभागातील आरोग्य विषयक तक्रारींचा विनाविलंब निपटारा करावा अशा सूचना देतो तसेच सर्व उपस्थितांचे आभार मानुन माहे सप्टेंबर २०१७ ची प्रभाग समिती सभा संपल्याचे जाहीर करतो.

सही/-
(कदम शशिकांत गणपत)
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा सचिव**,
(सभाशाखा),
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/३८/२०१७
दिनांक – १५/०९/२०१७